# नियमीत दिवाणी मुकदमा क्र.३१३/२०१४ मधील नि.३३ वरील आदेश

सदरचा अर्ज प्रतिवादी यांनी उपअधिक्षक, भूमि अभिलेख, सांगोला यांचे मार्फत मोजणी होऊन अहवाल सादर करण्याबाबत आदेश होण्याकरीता दाखल केला आहे.

२. प्रतिवादी यांचे अर्जातील कथन की, वादीने प्रस्तुतचा दावा निरंतर ताकीदीसाठी दाख्ला केलेला असून प्रतिवादी यांनी दाव्यास कैफियत दिली आहे. दाव्यातील विषयाचा विचार करता त्यामध्ये हद्दीखुणा व बांधाबाबत तक्रारीचे कथन केलेले आहे. दाव्यातील वाद कायमस्वरुपी संपुष्टात येण्याकरीता वादी व प्रतिवादी यांच्या मिळकती गट क्र.६७,६८ व ७० यांची मोजणी होणे जरुरीचे आहे. त्यामुळे उप अधिक्षक, भूमी अभिलेख, सांगोला यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक करुन गट क्र.६७,६८ व ७० यांची मोजणी करुन नकाशा न्यायालयासत हजर करणेकामी हुकूम करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

३. वादीने सदर अर्जावर आपले म्हणणे देऊन वादी व प्रतिवादी यांच्या दरम्यान गट क्र.६७,६८ व ७० च्या हद्दीचा वाद मिटण्यासाठी संयुक्तिक मोजणी करणेस वादीची हरकत नसल्याचे सांगितले आहे.

४. अर्जातील कथन व प्रतिवादी यांचे म्हणणे तसेच अभिलेखावरील कागदपत्रांवरुन खालील मुद्दे उपस्थित होतात त्यावरील निष्कर्ष कारणांसह खालील प्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | प्रतिवादीने अर्जात दिलेल्या कारणाकरीता दावा | अंशतः होकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| | मिळकतीची मोजणी करण्यासाठी न्यायालयीन आयुक्त यांची नियुक्ती करणे गरजेचे आहे का? | |
| २. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे.. |

## कारणमिमांसा

५. प्रतिवादीतर्फे ॲड. व्ही.बी.चव्हाण व वादीतर्फे ॲड. पी.व्ही.गंगथडे यांचा युक्तीवाद ऐकला.

६. अर्जाचे व अभिलेखावरील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले. वादीने प्रस्तुतचा दावा निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. त्यामध्ये दावा मिळकत गट क्र. ७०/२/२ च्या पश्चिम बाजूस असलेला बांध वादीच्या मालकीचा व वहिवाटीचा असल्याचे कथन करुन प्रतिवादी क्र. १ ते ३ हे त्यास हरकत अडथळा करीत असल्याचे कथन केले आहे. प्रतिवादी यांनी नि.१५ वर आपली कैफियत दाखल केली असून वादीचा दावा नाकारला आहे. तसेच दाव्यातील चतुःसिमा चुकीच्या दिलेल्या असून वादीने केलेले बांधाचे वर्णन चुकीचे आहे. तसेच वादी त्याचा मालक नसल्याचा बचाव घेतला आहे. त्यामुळे दाव्यातील कथन व प्रतिवादी यांनी घेतलेल्या बचावाचे अवलोकन केले असता वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये हद्दीखुणावरुन वाद असल्याचे दिसून येते. **मा. मुबई उच्च न्यायालय यांनी मल्हार वि. शिवाजी २०१४(४) एम.एच.एल.जे. २३७** या न्यायनिवाड्यामध्ये हद्दीबाबात व जमिनीच्या ओळखीबाबत वाद असल्यास दिवाणी प्रक्रिया संहीता आदेश २६ नियम ९ प्रमाणे स्थानिक तपासणी बाबत आदेश

पारित करता येवू शकतात. तसेच, हद्दीबाबतचे वाद तज्ञांची सहाय्यता घेऊन जसे की टी.आय.एल.आर यांनी मोजणी करुन मत व्यक्त करणे, अशा प्रकारे निर्णित करता येवू शकतात, अशाप्रकारे निष्कर्ष नोंदविले आहेत.

७. प्रस्तुत दावा जरी निरंतर ताकीदीसाठी असला तरी वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये बांधावरुन वाद असल्याचे दिसून येते. त्यामुळे प्रत्यक्ष स्थळावरील पाहणी करण्याकरीता न्यायालयीन आयुक्ताची नेमणूक केल्याशिवाय तेथील परिस्थिती समोर येणार नाही. वादीने मोजणी करण्यास कोणतीही हरकत नसल्याचे सांगितले आहे. तसेच वादी व प्रतिवादी यांनी मोजणी नंतर त्यांच्यामधील वाद संपुष्टात येण्यास मदत होणार असल्याचे सांगितले आहे. त्यामुळे प्रस्तुत दाव्यामध्ये मोजणी करण्यासाठी न्यायालयीन आयुक्त यांची नेमणूक करणे गरजेचे वाटते. परंतु प्रतिवादी यांनी गट क्र. ६७,६८ व ७० याची मोजणी होण्यास विनंती केली आहे. अभिलेखावर हजर केलेल्या गट क्र. ६७ च्या उता–याचे अवलोकन केले असता त्यावर प्रतिवादी क्र. २ हिचे नाव असल्याचे दिसते. तसेच गट क्र. ६८/२ च्या ७/१२ उता–यावर प्रतिवादी क्र.१ व गट क्र. ७०/२ब च्या ७/१२ उता–यावर वादीचे नाव असल्याचे दिसून येते. पंरतु गट क्र. ६८/१, ७०/२अ, ७०/२क यांचे ७/१२ उता–याचे अवलोकन केले असता त्यामध्ये मालकी हक्क सदरी नाव असणा–या व्यक्तींना दाव्यामध्ये पक्षकार म्हणून सामील करण्यात आलेले नाही. तसेच या दाव्यातील वादी व प्रतिवादी यांच्यामध्येच बांधावरुन वाद असल्याचे दिसून येते. त्यामुळे केवळ वादी व प्रतिवादी यांच्या मिळकतीची म्हणजेच गट क्र.६७,६८/२ व

७०/२ब यांची मोजणी करणे योग्य व न्यायाचे ठरत आहे. वरील सर्व विश्लेषणावरुन अर्ज अंशतः मंजूर होण्यास पात्र आहे. त्यामुळे मुद्दा क्र.१ यास अंशतः होकारार्थी उत्तर नोंदूवन मुद्दा क्र. २ साठी खालील आदेश पारित करीत आहे –

– **आदेश** –

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. वादी व प्रतिवादी यांची मिळकत गट क्र.६७,६८/२ व ७०/२ब या मिळकतींची संयुक्तीक मोजणी करण्यासाठी उप अधिक्षक, भुमी अभिलेख, सांगोला यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक करण्यात येत आहे.

३. उप अधिक्षक, भुमी अभिलेख, सांगोला यांनी गट क्र.६७,६८/२ व ७०/२ब या मिळकतींची संयुक्तीक मोजणी करुन प्रत्यक्ष स्थळावरील परिस्थिती व गट क्र. ७०/२ब च्या पश्चिमेकडील बांधाचे परिस्थितीसह नकाशा अहवाल या न्यायालयात दर करावा.

४. मोजणी फी प्रतिवादी यांनी परस्पर भुमी अभिलेख कार्यालय, सांगोला यांच्याकडे नियमाप्रमाणे भरावी.

(**ए.एच.शेख**)

दि.१५.१०.२०१९. तिसरे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, सांगोला.

**Certificate**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment

a)Name of the Stenographer :A.A.Chavan.

b) Court : 3rd Jt. Civil Court, Sangola

c) Judgment/Order signed by PO on : 15.10.2019

d) Judgment/Order uploaded on : 18.10.2019.